सं.फौ.ख.क्र. ४०/२०२३
CNR No.MHYA220000552023

अपराध क्र. १३/२०२३
शासन –वि– शेख अल्तपाफ
नि.क्र. १५ सलग

## <u>न्यायनिर्णय</u>

( दि. १५ एप्रिल, २०२६ रोजी घोषीत )

अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी. डी. कपूर तसेच बचाव पक्षातर्फे विद्वान वकील श्री. आर. व्ही. भोयर यांचा युक्तीवाद ऐकला.

२. अभियोग पक्षाचे असे म्हणणे आहे की, दि. २३.०१.२०२३ रोजी मौजा मांडवी येथे गेलो असता आरोपी हा तेथे सार्वजनिक ठिकाणी १ ते १० आकडयाचे चिठया देवून त्यांचे कडून पैसे स्वीकारुन वरली मटका नावाचा जुगाराचा हारजीतचा खेळ खेळतांना आढळुन आला होता.

३. सदर प्रकरणात दोन साक्षदाराला तपासले. सदरचे प्रकरण संक्षिप्त स्वरुपाचे आहे. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आढळून आला नाही. सदर साक्षदाराचा पुरावा आणि अभिलेखावरील परिस्थिती लक्षात घेता अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. पुराव्याअभवी आरोपींचे फौ.प्र.सं.कलम ३१३ अन्वये जवाब नोंदविले नाही.

४. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद आणि अभिलेखाच्या अवलोकनावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ समोर आले. त्या प्रत्येक मुद्दयास मी निर्वाळा देत त्यांच्याखाली त्या निर्वाळयाचे कारण नोंदविले आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निर्वाळा</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपी हा लोकांकडून पैसे घेऊन वरली मटका नावाचा जुगाराचा हारजीतचा खेळ अवैधरित्या खेळतांना आढळून आले? ... | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपी निर्दोष. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ व २ -</u>**

५. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने दोन पंच साक्षदार नामे **प्रमोद विठ्ठल मुप्पीडवार व राजु वसंता गुरेवार,** यांना तपासले आहे. त्यांच्या पुराव्यात आले की, आरोपी संबंधाने त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यांनी घटनास्थळ तथा जप्ती पंचनाम्यावरील त्यांची फक्त सही ओळखली. त्यानंतर त्यांनी संपूर्ण मजकूर नाकारला. वि.सहा.सरकारी वकील यांनी त्यांना बरेच सूचक प्रश्न विचारले परंतु, आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आढळून आला नाही.

६. यावरुन अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपी हा वरली मटका नावाचा जुगाराचा खेळ खेळतांना आढळून आले आणि आरोपीच्या ताब्यातून नगदी १०१०/- रूपये व जुगाराचे साहित्य जप्त केले होते, या बाबींवर संशय निर्माण होतो. अशाप्रकारे अभियोग पक्षाने आपली बाजू संशयापलिकडे सिध्द केली नाही. त्यामुळे आरोपीवर ठेवलेले कलम १२(अ) चे दोषारोप सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

७. प्रस्तुत प्रकरणात रोख रक्कम रु. १०१०/-(अक्षरी- एक हजार दहा रुपये फक्त) जप्त केल्याचे दिसते. आरोपीने जप्त रोख रकमेवर त्याचा हक्क सांगीतलेला नाही. त्यामुळे ते सरकार जमा करण्यात यावे. तसेच जप्तीत असलेले जुगाराचे साहीत्य मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर ते नष्ट करावे. सबब, मी मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करतो;

## आदेश.

१. भारतीय नागरिक सुरक्षा संहीतेचे कलम २७८(१), नुसार आरोपी क्र.१ शेख अल्ताफ शेख अब्दुल, आरोपी क्र. २ युसुफ खान अमुदीन खान, आरोपी क्र. ३ शेख मिराज शेख जाफर, आरोपी क्र. ४ अविनाश एकनाथ सुरपाम यांची महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम कलम१२(अ) च्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा जात मुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, पाटण यांना निर्देश देण्यात येते की, सदर गुन्हयातील जप्त रोख रक्कम रु. १०१०/- (अक्षरी- एक हजार दहा रुपये फक्त) अपील कालावधीनंतर शासन जमा करावेत व वरली मटका नावाच्या जुगाराचे साहित्य अपिल कालावधीनंतर नाश करावे.

४. आरोपीस निर्देशीत करण्यात येते की, त्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे बंधपत्र द्यावेत व सदरचे बंधपत्र हे पुढील सहा महिन्याकरीता वैध राहील.

५. सदर खटल्यातील जप्त एक विवो कंपनीचा मोबाईल हा अपिलाचा कालावधी संपल्यानंतर मुळ मालकास दिले नसल्यास नियमाप्रमाणे परत करण्यात यावे. परंतु, मुळ मालक मिळुन न आल्यास सदर वाहनांची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

SUDAM SHRIRAM KALE
Digitally signed by SUDAM SHRIRAM KALE
Date: 2026.04.15 17:29:28 +0530

झरी-जामणी
एप्रिल १५, २०२६

( एस. एस. काळे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
झरी जामणी, जि. यवतमाळ.

| “CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER.” | |
|---|---|
| | A. R. Bhoyar<br>NAME OF THE Stenographer |
| Name of the Judge | Shri. S. S. Kale |
| Date of pronouncement of order | 15/04/2026 |
| Order signed by P.O. on | 15/04/2026 |
| Order uploaded on | 15/04/2026 |